• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३३१ • रविवार, दि. ३ मार्च २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये

• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 331 • Sunday 3 March 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3








दैनिक

# मराठवाडा पत्र

महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | परभणी | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955


# विकास कामांतून मतदार संघाचा कायापालट - आ. नमिता मुंदडा



केज । प्रतिनिधी

**अंबाजोगाई शहराच्या ऐतिहासिक आणि धार्मिक भावनांशी जोडल्या गेलेल्या अमलेश्वर मंदिर या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन व दुरुस्तीसाठी राज्य शासनाच्या वतीने ८ कोटी ७७ लक्ष ५५ हजार ८३४ रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने या संदर्भात शासन निर्णय क्र. पुवसं २०२४/प्र.क्र.६३/सां.का.३ दि. १ मार्च २०२४ अन्वये हे आदेश काढण्यात आले आहेत. सदरील आदेशात पुढे असे म्हटले आहे की, मंत्रीमंडळाची विशेष बैठक छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक १६.०९.२०२१ रोजी पार पडली होती. त्यामध्ये घेण्यात आलेल्या निर्णयामध्ये मराठवाडा विभागातील ऐतिहासिक वास्तुंचे संवर्धन करण्याचा समावेश करण्यात आला असून विशेषतः त्यामध्ये अंबाजोगाई येथील प्राचीन वास्तुस्थळाचा विकास करण्याबाबत घोषणा करण्यात आली आहे.**

मा. मंत्रीमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार अंबाजोगाई येथील अमलेश्वर मंदिराचे जतन व दुरुस्ती कामासाठी रु.८,७७,५५,८३४/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत उपनिर्दिष्ट पत्रान्वये संचालक पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय विनंती केली आहे, या स्मारकाचे अंदाजपत्रक सन २०२२-२३ ची राज्य दरसूची व स्थानिक बाजारभावानुसार तसेच पुरातत्व संकेतानुसार तयार करण्यात आलेले आहे. त्यानुसार या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन व दुरूस्ती कामाच्या रु.८,७७,५५,८३४/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सदरील शासन निर्णयान्वये अमलेश्वर मंदीर, ता. अंबाजोगाई, जि. बीड या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन व दुरूस्तीकामाच्या रू.८,७७,५५,८३४/- (अक्षरी रूपये आठ कोटी सत्त्याहत्तर लाख पंचावन्न हजार सहाशे चऔतईस मात्र) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदरील प्रशासकीय मान्यतेनुसार निविदा प्रक्रिया पूर्ण करुन याप्रकरणी न्युनत्तम निविदेचा प्रस्ताव तसेच खर्चास वित्तीय मान्यतेचा प्रस्ताव शासनास सादर केल्यानंतर प्रस्तावित खर्चास वित्तीय मान्यता देण्यात येईल. या साठी होणारा खर्च मागणी क्र. झेडडी-२, १०३, पुरातत्वशास्त्र, (०१) (०६) राज्यातील ऐतिहासिक व सांकृतिक दृष्ट्या महत्वाचे किल्ले व धार्मिक स्थळे यांची जपणूक व संरक्षण कार्यक्रम २२०५-१३०२ २७ लहान बांधकामे या लेखाशिर्षात त्या त्या वर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतूदीतून भागविण्यात यावा. असे या आदेशात म्हटले आहे. सदरील शासनर्णय हा महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने निगर्मित करण्यात आला असून या आदेशावर महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचे उपसचीव नंदा मारोती राऊत यांची स्वाक्षरी आहे. अंबाजोगाई शहराच्या धार्मिक, पौराणिक आणि ऐतिहासिक परंपरेशी जोडल्या गेलेल्या या अमलेश्वर मंदिर राज्य संरक्षित स्मारक जतन व दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून घेण्यासाठी केज विधानसभा मतदारसंघाच्या आ. नमिता मुंदडा यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. आ. नमिता मुंदडा या स्वतः एक आर्किटेक्ट असून केज विधानसभा मतदारसंघातील पुरातत्व काळातील वास्तु आणि मंदिरे जतन करून त्यांची दुरुस्ती करण्याच्या कामांवर त्यांचे विशेष लक्ष आहे. याच माध्यमातून त्यांनी अंबाजोगाई शहरात असलेल्या संकलेश्वर मंदीर, भुचरनाथ मंदिर, आद्यकवी मुकुंदराज स्वामी समाधी, जोगाई सभामंडप, छोटा हत्ती खाना व इतर धार्मिक स्थळांच्या जतन व दुरुस्तीसाठी कोट्यावधी रुपयांचा निधी शासनाकडून मंजूर करुन घेतला आहे. आता या अमलेश्वर मंदिर

पुढील पानावर

## मविआकडून लोकसभा निवडणुकची जोरदार तयारी

मुंबई : आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यात महायुती तसेच महाविकास आघाडीकडून जोरदार तयारी सुरू केली आहे. राज्यात झालेल्या पक्ष फुटीनंतर राज्यातील राजकीय मताचं गणित बदललं आहे. यातच आता महाविकास आघाडीसोबत वंचित सोबत आल्याने लोकसभेची ही लढत चांगलीच रंगतदार होण्याची शक्यता आहे. तर दुसऱ्या बाजूला आता महाविकास आघाडीची संभाव्य यादी समोर आली आहे. अलिकडेच महाविकास आघाडीची महत्वाची बैठक मुंबईत पार पडली. या बैठकीत लोकसभा जागावाटप झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. यात ठाकरे गटाला सर्वाधिक २२ ते २३ जागा मिळण्याची शक्यता आहे.

पुढील पानावर

## पोलीस महासंचालक शुक्लांना सरकारने मुदतवाढ का दिली?



मुंबई : राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांना मुदतवाढ देण्यात आली आहे. २४ फेब्रुवारीला हा निर्णय घेण्यात आल्याने रश्मी शुक्ला यांना दोन वर्षांची मुदतवाढ मिळाली आहे. रश्मी शुक्ला या जूनमध्ये सेवानिवृत्त होणार होत्या. सध्या त्यांचा चार महिन्यांचा कार्यकाळ शिल्लक आहे. मात्र, याआधीच रश्मी शुक्ला यांना दोन वर्षांचा कार्यकाळ वाढवून देण्यात आला आहे. रश्मी शुक्ला आता जानेवारी २०२६ पर्यंत राज्याच्या पोलिस महासंचालक पदावर राहणार आहेत.

पुढील पानावर

## आसाराम बापू तुरुंगातच राहणार

नागपूर - बलात्कार प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या आसाराम बापूची प्रकृती खालावत असल्याने शिक्षेला स्थगिती द्या, अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी फेटाळली. त्यामुळे त्याला मोठा दणका बसला आहे. त्याचे वय आणि गुंतागुंतीचे आजार लक्षात घेऊन शिक्षा स्थगित करा अशी मागणी या याचिकेद्वारे करण्यात आली होती. आसारामने महाराष्ट्रातील खोपोलीतील माधवबाग हृदय रुग्णालयात उपचार घेण्याचा आपला सल्ला स्वीकारला असल्याचे वरिष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनी न्यायालयाला सांगितले. त्यानंतर न्या. संजीव खन्ना, न्या. दीपांकर दत्ता यांच्या खंडपीठाने रोहतगी यांना या प्रकरणी राजस्थान उच्च न्यायालयात जाण्याचे निर्देश दिले.

# पतसंस्थेच्या कॅशिअरला लुटणारा आरोपी गजाआड

बीड । प्रतिनिधी

राजश्री शाहु नागरी सहकारी पतसंस्थेची रक्कम घेवून जाणाऱ्या कॅशयरला एका अज्ञात टोळीने लुटत ३९ लाख १६ हजार १६० रुपयांची रोकड असलेली बॅग - लंपास केली होती. ही घटना १६ फेब्रुवारी रोजी घडली होती. यातील एका आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद करून त्याच्याकडून ९ लाखांची रोकड हस्तगत केली आहे. अद्याप तीन फरार आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत. १६ फेब्रुवारी रोजी रात्री ८ नंतर गणेश सुभाषराव देशमुख व योगेश लोभेकर हे राजश्री शाहू नागरीसह पतसंस्थेची दिवसभर जमा झालेली रोकड ३९ लाख - १६ हजार १६० रुपये बॅगमधून घेऊन जात असताना मुकुंदराज कॉलनी नवा मोंढा रोड येथे तीन अनोळखी इसम यांच्या बॅगमधून सर्व रोकड घेऊन पळ काढला. याप्रकरणात अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात १७ फेब्रुवारी रोजी गुन्हा नोंद झाला



आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष साबळे यांना नारायण शाहसव जोगदंड (रा. अंबा. कारखाना जि. बीड) व त्याच्या तीन साथीदाराबाबत माहिती मिळाली होती. या घटनेत यांचा हात होता. त्यानुसार साबळे यांनी आरोपी शोध घेण्यासाठी पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर यांच्या पथकास मार्गदर्शन करुन रवाना केले. अंबासाखर कारखाना परिसरात आरोपीचा शोध घेतला असता नारायण जोगदंड हा त्याचे अंबासाखर कारखाना वाघाळा वसाहतीत घरी - मिळुन आला. त्यास ताब्यात घेवुन गुन्ह्यात संदर्भात बारबाईने विचारपुस केली असता त्याने त्याचे इतर तीन साथीदार अशांनी बँकेचे पैसे लुटण्याचा प्लान करुन पैसे घेवुन निघताच मोबाईल वरुन सांगण्याचे व मिळालेली रक्कम आपसात वाटून घेण्याचे ठरवले होते. त्यावरुन उक्त नमुद आरोपीने त्याचे इतर साथीदारांना सदरची टिप देवून बँकेचे पैसे लुटीचा गुन्हा केला आहे. त्यावरुन सदर आरोपीचे ताब्यातुन गुन्हयांतील त्याचे हिश्शाला आलेली ९,००,०००/- रु ची रक्कम जप्त करण्यात आलेली आहे. आरोपी नामे नारायण शाहुराव जोगदंड वय २७ वर्षे रा. अंबा. सहकारी साखर कारखाना वाघाळा ता. अंबाजोगाई यास पुढील कारवाई कामी पो. ठा. अंबाजोगाई शहर

पुढील पानावर


## १२१ मंडळ कृषी अधिकाऱ्यांना नियुकत्या प्रदान

मुंबई । वृत्तसेवा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शिफारस करण्यात आलेल्या मंडळ कृषी अधिकारी संवर्गातील १२१ उमेदवारांना केवळ ७ महिन्यांच्या विक्रमी वेळेत नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत, अशी माहिती कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिली. *राज्याच्या इतिहासात यापूर्वी कधीही एमपीएससी मार्फत निवड झालेल्या उमेदवारांना केवळ सात महिन्यात नियुक्या देण्यात आलेल्या नव्हत्या. महाराष्ट्र कृषी सेवा गट ब म्हणजेच मंडळ कृषी अधिकारी संवर्गासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत एप्रिल २०२२ मध्ये परीक्षा घेण्यात आला होत्या. या परीक्षांमध्ये आयोगाने पात्र ठरवलेल्या उमेदवारांची यादी जुलै २०२३ मध्ये कृषी विभागास प्राप्त झाली. उत्तीर्ण उमेदवारांचे चारित्र्य पडताळणी, जात प्रमाणपत्र पडताळणी आणि वैद्यकीय तपासणी अशी सर्वसाधारण प्रक्रिया पूर्ण करावी लागते. ही प्रक्रिया बरीच वेळखाऊ असते. मात्र याबाबतीत केवळ ७ महिने इतक्या विक्रमी

पुढील पानावर

# उद्धवसाहेब ठाकरे पुन्हा मुख्यमंत्री होणार



मुंबई । वृत्तसेवा

लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापल्याचे पाहायला मिळत आहे. भाजपाने १९५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. तर, महाराष्ट्रातील उमेदवारांचा यात समावेश करण्यात आलेला नाही. दुसरीकडे महाविकास आघाडीत जागावाटपावरून बैठकांचे सत्र सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. यातच उद्धव ठाकरे पुन्हा मुख्यमंत्री होऊ देत, अशी प्रार्थना ठाकरे गटाने भराडी देवीचरणी केली आहे. राज्यातील तमाम भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या आंगणेवाडीत भराडी देवीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. भराडी देवीच्या दर्शनाला होणारी राजकारण्यांची गर्दी हेदेखील आंगणेवाडीच्या जत्रेचे एक वैशिष्ट्य मानले जाते. आंगणेवाडीत अनेक नेत्यांनी देवीच्या दर्शनासाठी हजेरी लावली. ठाकरे गटाच्या नेत्यांसह भाजपा नेतेही दर्शनासाठी आले होते, अशी माहिती देण्यात आली आहे. दरवर्षीप्रमाणे आई भराडी देवीची सेवा केली. गेल्या १५ वर्षांत जे जे मागितले, ते भराडी देवीने आम्हाला दिले आहे. तिचा आशिर्वाद आमच्यावर कायम आहे. यापुढेही तो असावा. तसेच सिंधुदुर्गासह महाराष्ट्रातील जनतेला ऐश्वर्य मिळाले. उद्धव ठाकरे हे पुन्हा मुख्यमंत्री होऊ दे, अशी प्रार्थना वैभव नाईक यांनी केली. तर कोकण रेल्वे प्रवासी संघटनेने आई भराडी चरणी नारळांच्या तोरणाची माळ अर्पण केली. कोकण रेल्वे मार्गावरील अनेक अडथळे, मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग लवकरात लवकर पूर्ण व्हावा, कोकणातील जनतेला सुख समृद्ध मिळावे, अशी देवीचरणी प्रार्थना करण्यात आली. दरम्यान, केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी आंगणेवाडीत भराडी देवीचे दर्शन घेतले. यावेळी निलेश राणे उपस्थित होते. आई भराडी देवीचे दर्शन घेऊन चांगले वाटले. राज्यात शिवसेना, भाजपा आणि राष्ट्रवादीचे सरकार राहावे. तसेच देशात मोदी सरकारने हॅटट्रिक करावी, अशी प्रार्थना केल्याचे नारायण राणे यांनी सांगितले.

## संपादकीय

### धान्योत्पादन

आपला देश धान्योत्पादनात स्वयंपूर्ण आहे. परंतु योग्य साठवणूक क्षमतेअभावी बरेच अन्न वाया जाते आणि शेतकरी व व्यापारी यांचे नुकसान होते. या समस्येवर मात करण्यासाठी केंद्र सरकारने सहकार क्षेत्रात जगातील सर्वात मोठी धान्य साठवणूक योजना सुरू केली आहे. या योजनेच्या चाचणी टप्प्याचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले आहे, ज्या अंतर्गत ११ राज्यांतील ११ प्राथमिक कृषी पतसंस्थांमध्ये (पीएसीएस) धान्य साठवणूक योजना सुरू केली जात आहे. त्यांनी ५०० पॅक्समध्ये पायाभूत सुविधा प्रकल्पांची पायाभरणीही केली. ग्रामीण भागात अतिरिक्त रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकासदेखील एक साधन ठरेल. अर्थव्यवस्थेच्या वाढीमध्ये केवळ कृषी आणि संबंधित क्षेत्रे महत्त्वाची भूमिका बजावत नाहीत; तर ग्रामीण भागातील मागणी वाढल्यामुळे उद्योगांचाही विकास होतो. केंद्र सरकार ग्रामीण भागात विविध प्रकारच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर भर देत आहे. तसेच भारताच्या निर्यात प्रक्रियेत अगदी गावे आणि शहरे समाविष्ट करण्याचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. साठवणूक योजना देखील त्या प्रयत्नांना मोठा आधार देईल. ही योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी सहकार मंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली एक समिती स्थापन करण्यात आली असून त्यात कृषी आणि शेतकरी कल्याण, ग्राहक व्यवहार, अन्न व सार्वजनिक वितरण, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री यांच्यासह सचिवांना सदस्य करण्यात आले आहे. या वर्षी ऑगस्टपर्यंत सर्व पॅक्स केंद्रांचे संगणकीकरण केले जाणार आहे. जगाच्या लागवडीयोग्य जमिनीपैकी ११ टक्के जमीन भारतात आहे, तर जागतिक लोकसंख्येच्या १८ टक्के लोकसंख्या भारतात आहे. संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेच्या २०२१ च्या मूल्यांकनानुसार, आपल्या देशातील एकूण धान्य उत्पादन ३११ दशलक्ष मेट्रिक टन आहे. परंतु एकूण साठवण क्षमता केवळ १४५ दशलक्ष मेट्रिक टन आहे. जगातील अनेक देशांमध्ये उत्पादनापेक्षा १३१ टक्के जास्त साठवण क्षमता आहे; तर आपल्या देशात ही क्षमता ४७ टक्के कमी आहे. आर्थिक विकासात सहकारी संस्था महत्त्वाची भूमिका बजावू शकतात आणि ही क्षमता ओळखण्याची गरज आहे, असा विश्वास पंतप्रधान मोदी यांनी व्यक्त केला. 'सहकारातून समृद्धी' या त्यांच्या सूत्राच्या आधारे या अन्न साठवणूक योजनेची रूपरेषा तयार करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत पॅक्स पातळीच्या पलीकडे कृषी पायाभूत सुविधा विकसित करायच्या आहेत. यामध्ये गोदामे, आवश्यकतेनुसार प्रक्रिया केंद्रे इत्यादींचा समावेश आहे. आपल्या देशात सध्या एक लाखाहून अधिक पीएसीएस आहेत, ज्यामध्ये १३ कोटी शेतकरी सदस्य आहेत. या योजनेमुळे पॅक्सच्या उपक्रमांची व्याप्ती वाढेल, धान्याचे संवर्धन होईल आणि शेतकर्यांना त्यांच्या उत्पादनाला चांगला भाव मिळू शकेल. यात खासगी क्षेत्रालाही सहभागी करून घेतले जाणार आहे. सरकार त्यासाठी आवश्यक ती जमीन आणि अर्थसहाय्य देणार आहे. खासगी कंपन्यांच्या या क्षेत्रातील कौशल्याचा लाभ घेणे तसेच ती जलदगतीने पूर्णत्वास नेणे हा यामागचा हेतू आहे. साठवणूक क्षमता वाढल्यामुळे अन्नधान्याचे काढणीनंतरचे नुकसान लक्षणीयरीत्या कमी झाल्यास ही योजना अत्यंत प्रभावी ठरेल यात शंकाच नाही.


**जाहिर प्रगटन**

मा. श्रीमती एस. एस. पिंगळे दिवाणी न्यायाधीश.व स्तर बीड यांच्या न्यायालयात,
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ३४५/२०२४
पोपट मोहन जाधव व निरंक

**अर्जदार – १) पोपट पि. मोहन जाधव, वय ६६, धंदा शेती, रा. लोणीघाट, ता.जि.बीड, २) मिना भ्र. धनराज डोके, वय ५७, धंदा घरकाम, रा. नागोबा वस्ती देवंग्रा, ता.भूम, जि.उस्मानाबाद, ३) राजेश्री भ्र. मधुकर वारे, वय ५१, धंदा घरकाम, रा. रत्नापूर, ता.जामखेड, जि. अहमदनगर.**

विरूध्द निरंक

**प्रकरण – भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मोहन पि. किसन जाधव** यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. **मयत मोहन पि. किसन जाधव** हे दिनांक २८/०७/२००३ रोजी राहते घरी लोणीघाट, ता.बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ हा मयताचा मुलगा असून अर्जदार क्र. २ व ३ ह्या मयताच्या विवाहित मुली आहेत. मयताची पत्नी तसेच मयताचे आईवडील बऱ्याच वर्षापुर्वी मयत झालेले आहेत. या अर्जदाराशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत तसेच त्यांच्या स्थावर व जंगम मिळकतीसंबंधी मृत्यूपत्र बनवलेले नाही अथवा कोणालाही नामनिर्देशीत केलेले नाही असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे . त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी . जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याने वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पुढील तारीख ०४/०४/२०२४**
**आज दिनांक २६/०२/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**
**क.लि.**

कोर्टाचा शिक्का

**मार्फत**
**ॲड. टी.व्ही.जाधव**

**आदेशावरून.**
**स्वाक्षरीत/-**
**अधिक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड.**


# पोलीस अधिकाऱ्याकडूनच पुणे शहरात ड्रग्सची तस्करी

**पुणे । वृत्तसेवा**

जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेनं खळबळ उडाली आहे. ड्रग्स विक्री प्रकरणात चक्क पिंपरी चिंचवडमधील एका फौजदाराला अटक करण्यात आली आहे. सांगवी पोलिसांनी गस्ती दरम्यान एका व्यक्तीकडून दोन किलो एमडी ड्रग्स जप्त केलं होतं. या ड्रग्सची किंमत तब्बल दोन कोटी रुपये इतकी आहे. या प्रकरणात नमामी झा नामक हॉटेल चालकाला अटक करण्यात आली होती. मात्र आता या प्रकरणाला धक्कादायक वळण लागलं आहे. आरोपी नमामी झाकडे जे ड्रग्स आढळून आले त्यामध्ये पिंपरी चिंचवड पोलीस दलातील निगडी पोलिस स्टेशनचा अधिकारी विकास शेळके याचाही सहभाग असल्याचं उघड झालं आहे. पोलिसांनी या प्रकरणात तातडीनं कारवाई करत विकास शेळके याला अटक केली आहे. झडतीमध्ये त्याच्याकडून तब्बल ४५ कोटी रुपयांचं ड्रग्स जप्त करण्यात आलं आहे. दरम्यान अटक करण्यात आलेल्या विकास शेळके याच्या मालकीच्या पिंपरी चिंचवड शहरात दोन ते तीन हॉटेल्स असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे पोलीसही चक्रावून गेले आहेत. सध्या या प्रकरणाचा तपास आमली पदार्थ विरोधी पथकाकडून सुरू आहे. शेळके यानं यापूर्वी ड्रग्स तस्करी केली आहे का? या प्रकरणात आणखी कोणते अधिकारी सहभागी आहेत का याचा शोध सुरू आहे, या प्रकरणामुळे पुन्हा एकदा पिंपरी चिंचवड पोलीस दलाची मान खाली गेली आहे. कारण १५ दिवसांपूर्वीच पिंपरी चिंचवड पोलीस दलातील दोन कर्मचारी खंडणी उकळल्या प्रकरणी निलंबित करण्यात आले होते. तर दोन अधिकाऱ्यांवर कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. एका वरिष्ठ अधिकाऱ्याची लाच प्रकणात बदली करण्यात आली आहे.

# उन्हाळ्यात अनेक आजारांचं प्रमाण वाढतंय?

उन्हाळा जवळ येताच अनेक आजारही डोकावू लागतात. यंदा फेब्रुवारी महिन्यातच देशातील अनेक राज्यांमध्ये वेळेआधीच उन्हाळा सुरू झाला आहे. याचा परिणाम लोकांच्या आरोग्यावर होत असून, त्यामुळे आजार वाढू लागले आहेत. महाराष्ट्रातही अनेक ठिकाणी तापमान वाढू लागलं आहे. साधारणत: एप्रिलपासून सुरू होणारा उन्हाळा यावेळी लवकर सुरू झाला आहे. अशा परिस्थितीत तुमची प्रतिकारशक्ती मजबूत राहिली तर तुम्ही आजारांपासून दूर राहू शकता, असे आरोग्य तज्ज्ञांचे मत आहे. चला तर मग जाणून घेऊया इम्युनिटी मजबूत करण्याच्या खास टिप्स कोणत्या आहेत. आपल्या देशात फेब्रुवारी-मार्च महिन्यात वसंत ऋतु असतो. या ऋतूत फारशी थंड किंवा उष्णही नसते. तापमानात हळूहळू वाढ होत असल्याने, आपले शरीर त्यानुसार स्वतःला अनुकूल करते. परंतु जेव्हा तापमानात अचानक वाढ होते, तेव्हा अनेक आजारांचं प्रमाणदेखील वाढतं. जुलाब, पोटदुखी, सर्दी आणि विषाणूजन्य आजार यामुळे पसरू लागतात. गेल्या दोन-तीन दिवसांपासून भारतात व्हायरल फिव्हरच्या रूग्णांची संख्या वाढली आहे. अचानक उष्मा वाढल्याने विषाणूच्या रुग्णांची संख्या वाढल्याचे आरोग्य तज्ज्ञांचे मत आहे. गेल्या दोन-तीन दिवसांपासून रुग्णालयात उपचारासाठी दाखल होणाऱ्या रुग्णांपैकी प्रत्येक चौथा रुग्ण सर्दी, तापाने त्रस्त आहे. श्वसनाचे आजार असलेल्या रुग्णांची संख्याही वाढत आहे. डोकेदुखी, रक्तदाबासोबत नाकातून रक्त येण्याची समस्याही आहे. हवामानात अचानक झालेल्या बदलामुळे लहान मुलं आणि रोगप्रतिकारक शक्ती कमी असलेले लोक या आजारांना बळी पडत आहेत. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, या ऋतूत आजारांपासून दूर राहायचे असेल, तर सर्वप्रथम उन्हात अचानक घराबाहेर पडणे टाळा. रात्री गरम झाल्यावर पंख्याचा वेग कमी ठेवा. हलके उबदार किंवा पूर्ण बाह्यांचे कपडे घाला. आहार योग्य ठेवा. खाण्यापिण्याकडे लक्ष द्या. हंगामी फळांचे सेवन करा. शक्यतो टरबूज, संत्री खा. जेवणात सॅलड असणे आवश्यक आहे. काकडी, हिरव्या भाज्यांचे सेवन करा. दही खाणे टाळा.

# समृध्दी महामार्गाचा रस्त्याच्या कामाचा दर्जा निकृष्ट -काँग्रेस





**मुंबई । वृत्तसेवा**

राजधानी मुंबई ते नागपूर ७०० किलोमिटरच्या समृद्धी महामार्गाचा शिंदे-फडणवीस सरकारने मोठा गाजावाजा केला, जाहिरातबाजी करुन पंतप्रधान मोदींच्या हस्ते उद्धाटनही केले. १२ तासात मुंबईहून नागपूरला पोहचणार असा दावा करणाऱ्या महामार्गाचेच १२ वाजले आहेत. समृद्धी महामार्ग पहिल्यापासूनच वादग्रस्त ठरला आहे. सातत्याने होत असलेल्या अपघाताचा प्रश्न असताना आता या महामार्गावरील एका पुलाला मोठा खड्डा पडला आहे. पुलावरील खड्ड्यांमुळे समृद्धी महामार्गाच्या कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह तर निर्माण झाले आहे. पुलावर पडलेला हा केवळ खड्डा नसून 'समृद्धी'ला शिंदे-फडणवीसांच्या भ्रष्टाचाराचे पडलेले हे भगदाड आहे, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील लोहोगावजवळच्या पुलाला खड्डा पडल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. अवघ्या १४ महिन्यातच पुलावर भला मोठा खड्डा पडल्याने या रस्त्याच्या बांधकामाचा दर्जा चांगला नसल्याचे स्पष्ट दिसत आहे. समृद्धी महामार्गाच्या आराखड्यात व बांधकामात त्रुटी असल्याच्या तक्रारी करण्यात येत होत्या, परंतु त्याकडे दुर्लक्ष केले गेले. नागपूर-मुंबई समृद्धी हा ५५ हजार कोटी रुपयांचा महामार्ग सुरुवातीपासूनच भ्रष्टाचाराचे कुरण ठरला आहे, असे नाना पटोले यांनी म्हटले. महामार्गासाठी जमीन संपादन करताना मोठा भ्रष्टाचार झाला. तसेच या महामार्गाच्या तांत्रिक बाबीमध्येही गडबड आहे. समृद्धी महामार्गाच्या आराखड्यासाठी तज्ञांच्या विशेष पथकाला हजारो कोटी रुपये दिले पण अपघाताचे प्रमाण पाहता रस्ते बांधणी करताना फारशी काळजी घेतल्याचे दिसत नाही. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने आणि एक्स्प्रेस वे साठी साठी निश्चित केलेले नियम पाळलेले नाहीत. रोड हिप्नॉसीसमुळे अपघात होतात असे काही काही तज्ञांनी सांगितले आहे, त्यावर काही उपाय केलेले नाहीत. रस्त्यावर ठरावीक अंतरावर चहापाणी, हॉटेल आणि स्वच्छतागृहे उपलब्ध नाहीत. त्यात आता रस्त्याला भगदाड पडल्याने या महार्गाने कोणाची समृद्धी केली हे दिसत आहे, असा टोलाही नाना पटोले यांनी लगावला.

## पान १ वरून

### मविआकडून

त्याच्या खालोखाल काँग्रेसला अठरा जागा तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला एकूण दहा जागा मिळण्याची शक्यता आहे. यातच ठाकरे गटाच्या कोट्यातून वंचितला जागा मिळण्याची शक्यता तर शरद पवारांच्या राष्ट्रवादीतून राजू शेट्टी यांच्या स्वाभिमानी संघटनेला एक जागा मिळणार आहेत. दरम्यान, महाविकास आघाडीकडून आता संभाव्य उमेदवारांची यादी समोर आली आहे. परभणी लोकसभा मतदारसंघातून ठाकरे गटाकडून उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. तर जालना लोकसभा मतदारसंघातून शिवाजीराव चोथे यांना ठाकरे गटाकडूनच उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे.

### पतसंस्थेच्या

यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे. उर्वरित तीन निष्पन्न फरार आरोपींचा स्थानिक गुन्हे शाखा, बीड शोध घेत आहे. सदरची कामगिरी पोलीस -निरीक्षक श्री. संतोष साबळे, पोउपनि श्रीराम खटावकर, पोह/मनोज - वाघ, प्रसाद कदम, पोना/विकास वाघमारे, सोमनाथ गायकवाड, - सचिन आंधळे, देविदास जमदाडे, गणेश हांगे, अश्विनकुमार सुरवसे,- - नारायण कोरडे, चालक/सुनिल राठोड सर्व नेम. स्थानिक गुन्हे - शाखा,

### विकास कामांतून

जतन व दुरुस्ती साठी ८ कोटी ७७ लक्ष ५५ हजार ८३४ रुपयांचा विशेष निधी राज्याच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडुन मंजूर करुन घेतला आहे. अंबाजोगाई शहर आणि परीसरातील प्रसिद्ध मंदिरापैकी एक असलेले हे अमलेश्वर मंदिर. बाराव्या शतकातील अमलेश्वर मंदिर हे असेच एक देखणे शिवमंदिर आहे. मराठवाड्यातील मंदिर स्थापत्याचा विचार केला तर मंदिर बांधणीच्या चळवळीची तिसरी अवस्था अंबाजोगाईच्या अमलेश्वर मंदिराच्या स्थापनेपासून सुरु होते. बाराव्या शतकाच्या शेवटच्या कालखंडात हे मंदिर उभारले गेले असावे. या मंदिराच्या बाहेरील भिंतीवर नक्षीदार पट्टयांचा वापर करणे हे या काळातले वैशिष्ट्य अमलेश्वर मंदिरावर स्पष्टपणे दिसते. अमलेश्वर मंदिराच्या बाह्यभिंतीवर काही शिल्प आहेत. या भिंतीचा काही भाग बाहेर काढलेला असून त्याला स्तंभाचा आकार दिला गेला आहे व पुढे आलेला भाग पानाफुलाच्या भुमीतीय आकृती शिल्पांनी क्षितिज समांतर पट्टे शिल्पीत केले आहेत. जो चालुक्यकालीन वैशिष्ट्यांचा प्रभाव वाटतो. नर्तनावस्थेतील गणेश शिल्प या मंदिरावरील एक उल्लेखनीय निर्मिती आहे. असे गणेश शिल्प क्वचितच पाहावयास मिळते. चंडेल राजाने उभारलेल्या खजुराहोच्या कंडारेश्वर मंदिराच्या पश्चिम भिंतीवर तळाला असे शिल्प आढळून आल्याचे सांगण्यात येते. या मंदिराला लागूनच मागील बाजूस खडकात कोरलेले एक तिर्थकुंड असून या तिर्थाला अनन्य साधारण महत्व आहे. या तिर्थाचे वैशिष्ट्य म्हणजे तिर्थाच्या पाक्याच्या डाव्या बाजूस बेलाचे पान टाकले तर ते बुडते; पण उजव्या बाजूस टाकले तर ते मात्र तरंगत राहते. सभामंडपाच्या छतावरील शिळेवर अंकीत शिल्पावरुन यादवकालीन लोकप्रिय भारतीय वाद्यांचा परिचय होतो. अलिकडेच या मंदिराचा जिर्णोद्धार भक्तांनी केला असून भक्तगणांसाठी काही खोल्या या ठिकाणी बांधण्यात आल्या आहेत.

### पोलीस

ज्यानंतर आता हा मुद्दा आज (ता. १ मार्च) अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी काँग्रेस नेते, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडून विधानसभेत उपस्थित करण्यात आला. विधानसभेत बोलताना नाना पटोले म्हणाले की, महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांना दोन वर्षांची मुदतवाढ देण्यात आली आहे. सरकारने हा निर्णय घेतला आहे. रश्मी शुक्ला यांना मुदतवाढ देण्याचे नेमके कारण काय? कारण कोणत्याही अधिकाऱ्याला महत्त्वाच्या पदावर मुदतवाढ देताना त्यासाठी काही नियम आहेत.

### १२१ मंडळ कृषी

वेळेत नियुक्त्यांची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. चारित्र्य पडताळणी, जात प्रमाणपत्र पडताळणी आणि वैद्यकीय तपासणी या बाबींच्या अधीन राहून नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत. यामुळे राज्यातील शेतकऱ्यांची कामे गतीने होण्यास मदत होणार आहे. याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून सर्व नवनियुक्त मंडळ कृषी अधिकारी यांचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी अभिनंदन केले आहे.

# दहावीचा मराठीचा पेपर फुटल्याने खळबळ

**नागपूर । वृत्तसेवा**

दहावीचा पेपर सोशल मीडियात व्हायरल झाल्याची घटना समोर आली आहे. यवतमाळमध्ये हा प्रकार घडलाय. माहिती मिळाल्यानंतर भरारी पथकाने येऊन यावर योग्य ती कार्यवाही केली आहे. पेपर यवतमाळच्या पांढरकवडा तालुक्यातील पाटणबोरी येथे केंद्रावरुन पेपर व्हायरल झाल्याची घटना घडली आहे. येथे बोर्डाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या दहाव्या वर्गाच्या मराठी विषयाचा पेपर सुरु होता. परीक्षा सुरु झाल्यापासून अवघ्या १० मिनिटातच व्हायरल झाला. याबाबत माहिती मिळाल्यावर भरारी पथकाने केंद्र गाठून उपस्थितांची जबानी घेतली. त्यानंतर पांढरकवडा पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. दहावीची परीक्षा कॉपीमुक्त व्हावी. यादृष्टीने विविध पथके गठीत करण्यात आली. हा पेपर अवघ्या दहा मिनिटांत सोशल मिडीयावर व्हायरल झाला. याप्रकरणी तक्रारीनंतर पोलिसांनी तपास सुरू केला आहे. दहावी उत्तीर्ण महिलेने शेताला बनवले बेट, करतेय लाखांत कमाई; गुगलनेही घेतली दखल परीक्षेला जाण्यापूर्वी कोणत्या गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत? ऐनवेळी नवीन अभ्यासण्याचा प्रयत्न करु नका. वर्षभर जो अभ्यास केलाय त्याची उजळणी करा. मन शांत ठेवा. जास्त ताण घेऊ नका. तुम्ही देत असलेली परीक्षा वर्षभर केलेल्या अभ्यासाचे फलित असेल. परीक्षा केंद्रावर कोणी मदत करेल, पर्यवेक्षक आपल्या दृष्टीने चांगला असेल,अशा भ्रामक कल्पनेत राहू नका. स्वत:च्या अभ्यासावर विश्वास ठेवा. कॉपी करण्याचा अजिबात प्रयत्न करु नका. छोटीशी चूक तुमच्या करिअरवर परिणाम करु शकते. बारावीच्या विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर रिपोर्टिंग वेळेच्या ३० मिनिटे आधी पोहोचा. परीक्षेला जाण्यापुर्वी हॉलतिकीट आणि ओळखपत्र घेतले आहे की नाही? हे तपासा. परीक्षा केंद्रात प्रवेश करताना विद्यार्थ्यांची तपासणी केली जाईल. नसेल तर तुम्हाला परीक्षेसाठी अडचण येऊ शकते. विद्यार्थ्यांना परीक्षा हॉलमध्ये मोबाईल, ब्लूटूथ, इयर फोन असे कोणतेही इलेक्ट्रॉनिक उपकरण नेऊ नका. प्रश्नपत्रिका सोडवताना प्रत्येक प्रश्नांना किती वेळ लागतो हे लक्षात ठेवा. त्यानुसार संपूर्ण पेपर आणि वेळेचे नियोजन करा. उत्तरपत्रिका लिहायला घेण्याआधी बैठक क्रमांक, परीक्षा केंद्र क्रमांक सर्व बरोबर टाका. पेपर देण्यापुर्वी तपासून पाहा. प्रत्येक नव्या प्रश्नाच्या उत्तराची सुरुवात नव्या पानावर करा..खाडाखोड करणे टाळा. प्रश्न बारकाईने आणि दोनवेळा वाचा. आपण अभ्यास केलेला प्रश्न वेगळ्या पद्धतीने विचारला जाऊ शकतो. त्यामुळे गोंधळून जाऊ नका. निकाल काय लागेल, हे तुमच्या हातात नाही. पण परीक्षा चांगली देणे हे नक्कीच आहे. परीक्षेवेळी कोणताही त्रास जाणवत असेल तर परीक्षा केंद्रावरील शिक्षकांच्या निदर्शनास आणून द्या. बारावीची परीक्षा आयुष्यातील शेवटची परीक्षा नाही. त्यामुळे मानसिक ताण घेणे टाळा आणि शांत, एकाग्र मनाने परीक्षा द्या.

# राज्यात मुलींची होतेयं तस्करी

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य महिला आयोगाच्या अहवालानुसार राज्यातील १६ ते २२ वयोगटातील तब्बल पावणेदोन हजार मुली व महिला गायब असून त्या परदेशात मानवी तस्करी व अवैध कामात ओढल्या गेल्या आहेत. हे प्रमाण अतिशय धक्कादायक असून यातील २७ मुलींना महाराष्ट्रात परत आणण्यात आयोगाला यश आले आहे. पालकांची सर्वाधिक जबाबदारी असून त्यांनी मुलींशी संवाद साधणे गरजेचे आहे, असे मत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा यांनी व्यक्त केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील आढावा बैठकीनंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या, कोविडनंतर मुली गायब होण्याचे प्रमाण वाढले असून मोबाइलमुळे अजाणत्या वयात वाढलेले प्रेमसंबंध आणि कुटुंबाची आर्थिक विवंचना ही महत्त्वाची दोन कारणे आहेत. अनेक मुली ओमान, मस्कत सारख्या परदेशात असून त्यांना महाराष्ट्रात आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. बालविवाह रोखण्यासाठी पुढील २ दिवसातच पत्र पाठवून कार्यालये, समाज मंदिर अशा ठिकाणी विवाहासाठी हॉल देताना संबंधितांनी मुलीच्या वयाचा दाखला मागणे बंधनकारक केले जाणार आहे. तसेच बालविवाह करणारे वधू-वर कुटुंबीय व संबंधित सर्व घटकांवर गुन्हे दाखल करण्याची सूचना दिली आहे. स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी धाडी टाकण्यात येतील. जिल्ह्यातील २८३ पैकी सर्व शासकीय कार्यालयांमध्ये महिलांसाठी अंतर्गत तक्रार निवारण समिती आहे. पण २ हजार ५६६ खासगी आस्थापनांपैकी फक्त ५६८ आस्थापनांमध्ये तक्रार निवारण समिती आहे. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आयोगाचे सदस्य, सामाजिक संस्था व कार्यकर्ते राज्यातील सर्व जिल्हा कार्यालयांना भेटी देऊन तेथील महिलांच्या तक्रारी, त्यांच्याबाबत घडणारे गुन्हे व प्रत्यक्ष कार्यवाही याची माहिती घेणार आहेत.

## सुधारित निवृत्तीवेतन योजना लागू

नागपूर – महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांपासून जुनी पेन्शन योजनेच्या मुद्द्यावरून मोठे वादंग पेटले आहे. खरे तर २००५ नंतर राज्य शासकीय सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू न करता नवीन पेन्शन योजना लागू करण्यात आली आहे. मात्र ही नवीन योजना शेअर बाजारावर आधारित असल्याने यामध्ये पेन्शनची आणि कौटुंबिक पेन्शनची हमी नसल्याचा आरोप केला जात आहे. त्यामुळे ही नवीन योजना रद्द करून पुन्हा एकदा पूर्वलक्षी प्रभावाने जुनी योजना लागू केली गेली पाहिजे अशी मागणी कर्मचाऱ्यांनी लावून धरली. विशेष म्हणजे ओ पी एस अर्थातच ओल्ड पेन्शन स्कीम पुन्हा एकदा लागू करण्यासाठी मार्च २०२४ मध्ये राज्यव्यापी संपदेखील पुकारण्यात आला होता. याच संपाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने सध्याच्या नवीन पेन्शन योजनेत सुधारणा व्हावी यासाठी एका तीन सदस्य अभ्यास समितीची स्थापना केली होती. दरम्यान या समितीने आपला अहवाल वर्तमान शिंदे सरकारकडे नुकत्याच काही दिवसांपूर्वी सादर केला होता. अहवाल सरकारकडे सादर झाल्यानंतर याबाबत सरकारी कर्मचाऱ्यांसोबत चर्चा झाली.

## महाराष्ट्र काँग्रेस विचाराचे राज्य

मुंबई – महाराष्ट्र हे काँग्रेस विचाराचे राज्य आहे. राज्यात काँग्रेस चे विचार तळागाळापर्यंत पोहचले आहे. त्यानंतर काँग्रेस पराभूत होत होते. मी सूत्र घेतल्यानंतर राज्यात काँग्रेसकडे नव्हत्या, त्या जागा आम्ही जिंकल्या. माझ्या पक्षाध्यक्षपदाच्या कार्यकाळात विजय मिळवला. म्हणजे यापूर्वी निवडणुकीत मॅच फिक्सिंग केले होते का? हे जे मॅच फिक्सिंग करणारे होते, त्यांना माझा त्रास होत होत्या. महाराष्ट्रात काँग्रेस एका खासदारावर कसे पोहचले. मला कोणावर आरोप करायचे नाही, परंतु मला अंगावर घेणाऱ्यांना मी शिंगावर घेणार असल्याचे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले. नाना पटोले यांच्या कार्यशैलीला कंटाळून पक्षातून लोक बाहेर पडत असल्याचा आरोप आता होत आहे. त्यावर टीव्ही९ मराठीच्या कॉनक्लेव्हमध्ये नाना पटोले यांनी उत्तर दिले आणि पक्षातंर्गत विरोधकांना इशाराही दिला. आता नाना पटोले यांचा हा रोख कोणाकडे होता? त्याची चर्चा रंगली आहे. या देशाच्या प्रक्रियेत न्याय दिला पाहिजे ही भूमिका घेऊन राहुल गांधी मणिपूरला येणार आहेत. देशाची लोकशाही आणि संविधान वाचवण्याचं उत्तरदायित्व आपलं आहे. संविधान आणि लोकशाही भीकेने मिळाली नाही. काँग्रेस आणि इतर नेत्यांच्या बलिदानाने हे स्वातंत्र्य मिळालं आहे. ही व्यवस्था जिवंत राहिली पाहिजे, ही भूमिका घेऊन आम्ही काम करत आहोत.

## पाचवी,आठवीची यंदा वार्षिक परीक्षा

मुंबई – दहावीची परीक्षा संपल्यानंतर एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांची वार्षिक परीक्षा होणार आहे. या परीक्षेत विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करून नापास झालेल्या विद्यार्थ्यांची जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात फेरपरीक्षा होणार आहे. या वार्षिक परीक्षेसाठी शाळास्तरावर प्रश्नपत्रिका तयार कराव्यात, अशा सूचना राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने (एमएससीईआरटी) दिल्या आहेत. शालेय शिक्षणात पहिली ते पाचवी प्राथमिक तर सहावी ते आठवी उच्च प्राथमिक असे गट तयार करण्यात आले आहेत. प्रत्येक गटाच्या शेवटच्या वर्षात विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्याच्या सूचना केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने दिल्या होत्या. त्यानुसार पाचवी आणि आठवीच्या यंदापासून वार्षिक परीक्षा घेण्यात येत असून या परीक्षेआधारे विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केले जाणार आहे. सदर परीक्षेसाठी शाळास्तरावर प्रश्नपत्रिका तयार करण्यात याव्यात. विद्यार्थ्यांच्या अधिकच्या सरावासाठी एमएससीईआरटीच्या वेबसाईटवर नमुना सराव प्रश्नपत्रिका व संविधान तक्ते अपलोड केलेले आहेत. वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या प्रश्नपत्रिकांचा आधार घेऊन सर्व व्यवस्थापनाच्या शाळांनी आपापल्या स्तरावर प्रश्नपत्रिका तयार करून परीक्षांचे आयोजन करावे, अशा सूचना एमएससीईआरटीने दिल्या आहेत.

## गावठी कट्टा प्रकरणी एका आरोपीस न्यायालयीन कोठडी

लातूर : बेकायदेशीरपणे गावठी कट्टा आणि सहा जिवंत काडतुसे बाळगणाऱ्याला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली असून, त्याला लातूर येथील न्यायालयात हजर करण्यात आले असता, न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. पोलिसांनी सांगितले, लातूर शहरातील प्रकाश नगरातील चंद्रोदय कॉलनीत राहणाऱ्या जितेंद्र तुकाराम जाधव (वय ५१) यांच्याकडे अवैध गावठी कट्टा आणि सहा जिवंत काडतुसे असल्याची माहिती खबऱ्याने पोलिसांना दिली. या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला ताब्यात घेतले. झाडाझडती घेत कसून चौकशी करून एक गावठी कट्टा आणि जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. त्याला गुरुवारी लातूर येथील जिल्हा न्यायालयात हजर करण्यात आले असता, न्यायालयाने १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

# महिनाभरात नागपुरात १३ खून

मुंबई: राज्याची उपराजधानी नागपूरात गेल्या फेब्रुवारी महिन्यातील विविध हत्या आणि अपराधांच्या घटनेने शहर हादरले आहे. या गंभीर प्रकरणाचे पडसाद आज राज्याच्या विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनात देखील उमटतांना दिसून आले. याविषयी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सभागृहात अनेक प्रश्न विचारात सत्ताधाऱ्यांसह गृहमंत्री आणि राज्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांना धारेवर धरले. गृहमंत्र्यांच्या नागपूरात गेल्या २० दिवसांमध्ये१३ खुन झाले असून हत्या सत्र थांबता थांबत नाहीये. मंत्रालयात गुन्हेगार रीलबाजी करून समाज मध्यमांवर प्रसारित करीत आहेत. तर एका सत्ताधारी नेत्याने आईवर आणि तिच्या मुलीवर अत्याचार केला आहे. असे अनेक प्रकार राज्यात घडत असतांना राज्याच्या गृहमंत्र्यांची कार्यक्षमता हरवली आहे का, असा प्रश्न विजय वडेट्टीवार यांनी गृहमंत्र्यांना विचारला आहे. राज्यात गुन्हेगारीने डोके वर काढले असताना राज्याचे मुख्यमंत्री यांच मौन का आहे, अजित दादा देखील यावर काही का बोलत नाही असा प्रश्न देखील वडेट्टीवार यांनी सभागृहात उपस्थित केला. नागपूर शहरात गेल्या फेब्रुवारी महिन्यातील २० दिवसांमध्ये मध्ये १३ खुन झाले. यात एका प्रेस फोटोग्राफरचा देखील समावेश आहे. राज्याच्या मुख्यमंत्र्यांसोबत गुंड सर्रास फिरत असल्याचे चित्र आहे. सोबतच मंत्रालयाच्या परिसरात हे गुंड रीलबाजी करून समाजात दहशत पसरवत आहेत. राज्यातील गुन्हेगारी विकोपाला जात असतानाच, नवी मुंबईतील सत्ताधारी पक्षाच्या एक नेत्याने आई आणि तिच्या मुलीवर अत्याच्यार केला आहे. राज्यात अशा प्रकारचे कृत्य घडत असतील तर या वर कोणी काही बोलणार आहे की नाही, असा प्रश्न विजय वडेट्टीवार यांनी सभागृहात उपस्थित केला. राज्यात दिवसाढवळ्या होणाऱ्या या घटना बघितल्या तर या राज्याचे भविष्य काय असेल. अशा बलात्काराच्या घटना होत असताना राज्यकर्त्यांनी एकमेकांना टाळी देण्यापेक्षा त्या मायलेकीकडे एखादे शस्त्र दिले असतं तर सत्ताधारी नेत्याचा आज त्यांनी जीव घेतला असता. एकीकडे आम्ही छत्रपती शिवरायांचे नाव घेतो, प्रभू श्रीरामांचे नाव घेतो. मात्र खरंच हे धर्माचे राज्य आहे का असे प्रश्न देखील वडेट्टीवार यांनी सभागृहात बोलतांना उपस्थित केला. आज राज्यात ऑर्केस्ट्राच्या नावावर उघडपणे डान्सबार सुरू आहे. या सर्वांवर पोलीसचा आशीर्वाद असल्यामुळेच या अशा घटना घडत आहे. निवडणुकांसाठी उभा राहणारा पैसा याच डान्सबार मधून पुरवला जातो का? असा प्रश्न देखील वडेट्टीवार यांनी सत्ताधाऱ्यांना विचारला. याबाबत आम्ही पोलीस आयुक्तांना देखील अनेकदा पत्रव्यवहार केला. मात्र अद्याप कुठलीही कारवाई करण्यात आली नाही. या प्रकरणात कोण कोण सहभागी आहे, याबाबत चौकशी करून जर का माहिती घेतली, तर सर्वांची मान नजरेने खाली जाईल, असे देखील विजय वडेट्टीवार म्हणाले. आपण सर्वांनी चिपळूण ची घटना देखील अनुभवली आहे. सुसंस्कृत राज्यामध्ये यापूर्वी कधीही असे झाले नाही. त्या ठिकाणी आई बहिणीवरून एकमेकांना शिव्या देण्यात आल्या. लोकप्रतिनिधीत जर आई बहिणींवरून शिव्या देत असतील तर त्यांच्यावर कारवाई करण्याचे धाडस तुम्ही दाखवणार आहात का? ते कारवाईस पात्र आहे की नाही? असा प्रश्न आज महाराष्ट्राच्या जनतेला पडला आहे. खुल्या माईक वरून शिव्या आणि धमक्या दिल्या जात आहे. या संस्कृतीचा तुम्ही समर्थन करणारे आहात का? हे कृत्य करणाऱ्यांना पाठीशी घालणारे तुम्ही आहात का, असा प्रश्न देखील विजय वडेट्टीवार यांनी सभागृहात उपस्थित केला. एक आमदार पोलीस आमचं काय वाकड करू शकेल, असे सर्रासपणे बोलत आहे. यांच्या खिशात पोलीस आहेत का? पुढे ते म्हणतात, माझे कितीही व्हिडिओ काढले तरी कोणी काहीही करू शकत नाही. हे व्हिडिओ दाखवून दाखवून कोणाला दाखवतील, तर आपल्या बायकोला दाखवतील. खरंच हे धर्माचे राज्य आहे का? सध्या राज्याला खड्ड्यात घालण्याचे जोरदार काम या नेत्यांकडून सुरू आहे. अशा बेताल वक्तव्य करणाऱ्यांवर काय कारवाई केली जाईल, याचे उत्तर आम्हाला हवं असल्याचे देखील विजय वडेट्टीवार म्हणाले.



## नवीन सरकार स्थापन?

**मुंबई । वृत्तसेवा**

२०२४ मध्ये लोकसभेच्या निवडणुका होणार आहेत. १७व्या लोकसभेचा कार्यकाळ १६ जून २०२४ रोजी संपणार आहे. अशा परिस्थितीत निवडणूक आयोग १६ जूनपूर्वी सार्वत्रिक निवडणुका घेईल आणि नवीन सरकार स्थापन होईल. लोकसभेच्या शेवटच्या सार्वत्रिक निवडणुका एप्रिल आणि मे २०१९ मध्ये झाल्या होत्या. केंद्रात स्पष्ट बहुमत असलेले सरकार स्थिर सरकार असेल तर दर पाच वर्षांनी लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका होतात. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ८३ नुसार लोकसभेच्या निवडणुका दर पाच वर्षांनी एकदा घेतल्या जातात. भारतीय निवडणूक आयोग १८ व्या लोकसभा निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर करणार आहे. देशातील एक पात्र मतदार हा भारतीय नागरिक असावा आणि त्याने/तिने वयाची १८ वर्षे पूर्ण केली असल्यास मतदान करू शकतो. मात्र, त्याला मतदान करण्यासाठी मतदार यादीत नाव नोंदवावे लागेल. यासह, भारत निवडणूक आयोगाने जारी केलेले वैध मतदार ओळखपत्र असणे आवश्यक आहे. २०१९ मध्ये झालेल्या गेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपला प्रचंड बहुमत मिळाले होते. देशात लोकसभेच्या एकूण ५४३ जागा आहेत आणि बहुमतासाठी २७२ जागा आवश्यक आहेत.

## डीजेच्या गोंगाटावर नाचताना विद्यार्थ्याचा मृत्यू?

**नगर । वृत्तसेवा**

पुणतांबा येथील कृषी तंत्र विद्यालयाच्या एका विद्यार्थ्याचा निरोप समारंभातील डीजेच्या गोंगाटामुळे मृत्यू झाला. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी मात्र डीजेचा आवाज नियंत्रणात होता व मृत्यूचे कारण वेगळे असू शकते, असा दावा केला आहे. बुधवारी दुपारी ही घटना घडली. राहुरी तालुक्यातील वरवंडी येथील सुयोग कैलास अडसुरे (वय २०) असे मयत विद्यार्थ्याचे नाव आहे. तो कृषी विद्यालयाच्या पदविका अभ्यासक्रमातील द्वितीय वर्षाचा विद्यार्थी होता. तो पुणतांबा येथे विद्यालयाच्या वसतिगृहात राहत होता. विद्यालयाची शुक्रवारपासून परीक्षा सुरू होत आहे. त्यामुळे निरोप समारंभामध्ये डीजे लावण्याची विद्यार्थ्यांची मागणी होती. त्यानुसार गावातील एक डीजे तेथे लावण्यात आला. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी हा निरोप समारंभ आयोजित केला होता. दुपारी साडेबारा वाजेच्या दरम्यान विद्यार्थ्यांचे नाचगाणे सुरू झाले. याच वेळी सुयोग याला छातीत त्रास जाणवू लागला. त्याला पुणतांबा येथील खासगी रुग्णालयात नेण्यात आले. तेथून पुणतांबा ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार श्रीरामपूर येथील साखर कामगार रुग्णालयात त्याला भरती करण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच सुयोग याला मृत घोषित करण्यात आले.

# लातूर जिल्ह्यातील १५३ केंद्रावर दहावीची कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा



**लातूर । वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी परीक्षेला शुक्रवारी सुरुवात झाली. पहिलाच मराठीचा पेपर कॉपीमुक्त वातावरणात जिल्ह्यातील १५३ केंद्रावर पार पडला. दरम्यान, ३९ हजारांवर विद्यार्थी परीक्षेला सामोरे गेले असून, विविध केंद्रावर पुष्प देऊन विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवित स्वागत करण्यात आले. दहावीच्या लेखी परीक्षेला शुक्रवारपासून सुरुवात झाली. लातूर जिल्ह्यातील ३९ हजार ७१ विद्यार्थी परीक्षेला सामोरे गेले. बोर्डाच्या वतीने १५३ केंद्रांचे नियोजन करण्यात आले. कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा पार पडावी यासाठी भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली होती. या पथकांनी विविध केंद्रांना भेटी देत तपासणी केली. लातूर तालुक्यातील बोरी येथील केंद्रावर एक कॉपीकेस सापडली. त्या व्यतिरिक्त सर्व केंद्रावर शांततेत परीक्षा झाली. शुक्रवारी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत मराठी विषयाचा पेपर झाला. लातूर विभागीय मंडळ आणि माध्यमिक शिक्षण विभागाच्या वतीने २२ परीक्षकांची नियुक्ती करण्यात आली होती. तसेच २९ भरारी पथके नियुक्त होती. लातूर विभागीय मंडळाचे अध्यक्ष सुधाकर तेलंग, माध्यमिक शिक्षणाधिकारी नागेश मापारी यांनी विविध केंद्रांना भेटी देत तपासणी केली. यंदा विद्यार्थ्यांना १० मिनिटांचा अतिरिक्त वेळही देण्यात आला. लातूर तालुक्यात ५१ केंद्रांवर १४,०६५, औसा १३ केंद्रांवर ३,१०४, निलंगा १६ केंद्रांवर ४,००१, शिरूर अनंतपाळ ४ केंद्रांवर ८४३, देवणी ६ केंद्रांवर १,२९३, उदगीर २५ केंद्रांवर ६,०६९, जळकोट ४ केंद्रांवर १,००२, अहमदपूर १९ केंद्रांवर ४,६४४ आणि रेणापूर तालुक्यातील ६ केंद्रांवर १ हजार ७९५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

# मिस वर्ल्डच्या स्पर्धक संघाच्या मुख्यालयात

**नागपूर । वृत्तसेवा**

मिस वर्ल्ड स्पर्धेतील काही स्पर्धकांनी नागपुरात येत थेट राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या रेशीमबाग येथील डॉ. हेडगेवार स्मृतिमंदिर परिसराला भेट दिली. यावेळी त्यांनी आद्य सरसंघचालक डॉ. केशव बळीराम हेडगेवार व द्वितीय सरसंघचालक गोळवलकर यांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेतले. मिस वर्ल्ड स्पर्धेत देशविदेशातील स्पर्धक सहभागी होतात व अशाप्रकारे या स्पर्धकांनी नागपुरात भेट देण्याची ही पहिलीच वेळ ठरली. ७१ वी मिस वर्ल्ड स्पर्धा २८ वर्षांच्या कालावधीनंतर भारतात होत आहे. ९ मार्च रोजी ग्रँड फिनाले आहे. त्याअगोदर या स्पर्धक भारतातील महत्त्वाच्या ठिकाणी भेट देत आहेत. गुरुवारी या



स्पर्धेतील सहा स्पर्धक

तरुणींनी मिस वर्ल्ड ऑर्गनायझेशनच्या सीईओ ज्युलिआ मोरले यांच्यासह स्मृति मंदिर परिसराला भेट दिली. त्यांनी यावेळी संघ कार्य व सेवाप्रकल्पांबाबत जाणून घेतले. त्यांनी यावेळी संघाच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली व त्यांच्या सामाजिक कार्य अनुभवदेखील सांगितले. स्मृतिमंदिर परिसरातील संघाचे अधिकारी विकास तेलंग यांनी या वृत्ताला दुजोरा दिला. मिस वर्ल्डच्या अधिकृत इन्स्टाग्राम पेजवरदेखील ही छायाचित्र शेअर करण्यात आली. या स्पर्धकांमध्ये कॅरोलिना तेरेसा बैलावस्का, सिल्विहा व्हॅनेस्सा पोन्से डेलिओन सांचेझ, जेसिका गॅगेन, सिनी सदानंद शेट्टी, पॉला सांचेझ, क्रिस्टिन राईट, क्लाऊडेमनागाका मशेगो व व्हिक्टोरिआ जोसेफिन्मे डी सोर्बो यांचा समावेश होता. संघस्थानी येऊन मला आनंद होत आहे. समाजाच्या विविध क्षेत्रांत त्यांचे कार्य जाणून मी प्रभावित झाली अशी भावना भारताची स्पर्धक सिनी शेट्टी हिने व्यक्त केली. या स्पर्धेत १२० देशांच्या स्पर्धक सहभागी होणार आहेत. या स्पर्धक तरुणींनी आयोजित ताडोबा फेस्टिव्हलमध्येदेखील सहभाग नोंदविला.

## गटशिक्षणाधिकारी कार्यालयातच विद्यार्थ्यांची भरली शाळा

**हिंगोली । वृत्तसेवा**

तालुक्यातील कोंढूर शाळेतील शिक्षक लेकूळे यांची समायोजन या पद्धतीने बदली केली आहे. परंतु सदरची बदली रद्द करावी, या मागणीसाठी कोंढूर येथील पालक व विद्यार्थ्यांनी १ मार्च रोजी गटशिक्षणाधिकारी कार्यालयातच शाळा भरविली. तालुक्यातील कोंढूर शाळेतील शंकर लेकुळे हे शिक्षक सन २०२२-२३ च्या संचमान्यतेनुसार शाळेवर अतिरिक्त ठरले आहेत. त्यामुळे त्यांचे समायोजन २९ फेब्रुवारी रोजी शिक्षण विभागाने सांडस येथील शाळेत केले आहे. लेकुळे यांची समायोजनाने झालेली बदली रद्द करावी, यासाठी कोंढूर येथील पालक व विद्यार्थी गटशिक्षणाधिकारी कार्यालयात आले. यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांची कार्यालयातच शाळा भरवून बदली रद्द करा व कोंढूर येथील शाळेत पुन्हा पाठवा, अशी मागणी केली. शिक्षक लेकुळे हे शाळेत चित्रकला, वर्ग सजावट, शालेय खेळाद्वारे पाठांतर, इस्त्रो भेट, संगणक साक्षरता, विषयनिहाय कार्यशाळा, आकाश निरीक्षण, स्वच्छता मोहीम आदी उपक्रम राबवितात. त्यामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढली आहे. या शिक्षकांना पुन्हा कोंढूर येथील शाळेत पाठवा, अशी मागणी पालकांनी केली. यावेळी विनोद बांगर, विठ्ठल पतंगे, मारोती पतंगे, पांडुरंग भुरके, शारदा पवार, प्रसाद पतंगे, पंकज पतंगे, भागवत पतंगे, भुजंगराव पतंगे, सुधाकर पतंगे, अनिल पतंगे आदींची उपस्थिती होती.

# पिंप्री शिवारात बेसुमार वाळूचा उपसा

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील पीप्री येथे अवैध्य वाळू तस्करांच्या बातम्या अनेक दैनिकांमधून प्रसारित करून शासन व प्रशासनाला जागे करण्याचे काम सातत्याने प्रयत्न करण्यात आले पन केज तालुक्यातील पींप्री येथील नदी पात्रातील अवैध्यरित्या वाळूचा उपसा सुरूच आहे. केज तालुक्यातील पीप्री येथील बंद वाळू नदी पात्रातुन राज रोज पणे वाळू तस्करांनी नदी पात्र पोखरुन टाकली आहे. त्यामुळे प्रशासनाचा कोट्यावधीचा महसूल बुडवला जात आहे केज तालुक्यातील अवैद्य वाळू तस्करी स्थानिक प्रशासनाच्या डोळ्यासमोर होत असताना सुद्धा जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. केज तालुक्यातील अवैध वाळू तस्करी च्या बाबत कोणताही मंडळ अधिकारी तलाठी कारवाई करण्यास घाबरतात असे तालुक्यातील चित्र आहे. विशेष म्हणजे याबाबत माहिती जिल्हाधिकारी पोलीस अधीक्षक उपविभागीय अधिकारी तहसीलदार ठाणेदार यांना माहीत असून सुद्धा शून्य आहे. रात्रीच्या कारवाई च्या वेळी सुद्धा वाळू तस्करी चालू आहे ही नेमकी कोणाच्या आर्शिवादाने चालू आहे असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे. आशीवार्दाने चालू आहे हा मात्र प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडलेला आहे पण कुठल्याही प्रकारची कारवाईदिसून येत नाही रात्रंदिवस आधुनिक यंत्राद्वारे रात्रीच्या अंधारात अवैध वाळू सुरु असते परंतु आमचे प्रतिनिधी यांनी संपर्क साधला असता संबंधित अधिकाऱ्यांना फोनद्वारे माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता संबंधित अधिकाऱ्यांचा उद्धटपणे उत्तरे दिली जातात किंवा पत्रकार यांनी तहसीलदार यांच्याकडे फोन केला असता त्यांना फोन उचलण्याची अलर्जी आहे की काय असा प्रश्न उपस्थित होतो.



## अज्ञात वाहनाच्या धडकेत दोघांचा मृत्यू

बीड - नवगण राजुरीहून पारगावकडे निघातलेल्या तरुणांच्या मोटारसायकलला अज्ञात वाहनाने जोराची धडक दिल्याने यामध्ये दोघे तरुण गंभीररित्या जखमी होऊन ठार झाल्याची घटना नवगण राजुरी परिसरातील देवराज हॉटेलच्या बाजुला रात्री घडली. शुभम महादेव डोके व बालाजी खेलबा चादर (रा. पारगाव ता. वाशी जि. धाराशीव) या तरुणाच्या मोटारसायकलला रात्री अज्ञात वाहनाने जोराची धडक दिली. या अपघातात दोघेजण गंभीररित्या जखमी होऊन ठार झाले आहेत. या प्रकरणी अज्ञात वाहन धारकाविरोधात बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कुलकर्णी यांचे निधन

केज : शहरातील समर्थ नगर भागातील रहिवासी प्रकाश त्रिबंकराव कुलकर्णी (वय ७१) यांचे रविवार दि.२५ फेब्रुवारी रोजी दुपारी ०१.१५ वाजता ह्रदय विकाराच्या झटक्याने दु:खद निधन झाले. प्रकाश कुलकर्णी हे राज्य परिवहन महामंडळातुन निवृत्त कर्मचारी होते. शुक्रवारी २३ फेब्रुवारी रोजी मुलांनी त्यांचा ७१ वा वाढदिवस पुणे येथे साजरा केला होता. वाढदिवसानंतर अवघ्या दोनच दिवसात त्यांनी जगाचा निरोप घेतला. पी.टी. कुलकर्णी यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या अकाली निधनाने कुलकर्णी परिवारावर शोककळा पसरली आहे. कुलकर्णी परिवाराच्या दु:खात दै. मराठवाडा पत्र परिवार सहभागी आहे.

## विज्ञान प्रदर्शनाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



बीड - येथील तुलसी इंग्लिश स्कूल बीड येथे दि २८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता 'भव्य विज्ञान प्रदर्शन' सोहळा पार पडला. विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन इंजि. वशिष्ठ तावरे यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी तुलसी शैक्षणिक समूहाचे प्रमुख तथा देवगिरी प्रतिष्ठान अध्यक्ष प्रा.रोडे, उनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. विज्ञान प्रदर्शनाचे बक्षीस प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. विज्ञान प्रदर्शनात तुलसी इंग्लिश स्कूल येथील विद्यार्थ्यांनी विविध कल्पनांनी आपले प्रकल्प सादर केले होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते उत्कृष्ट प्रकल्पांना पारितोषिक देण्यात आले. प्रदर्शनाची वेळ सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत होती. यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी विविध प्रकल्प सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले होते.

## अपघात तरुण ठार

बीड - नवगण राजुरीहून पारगावकडे निघातलेल्या तरुणांच्या मोटारसायकलला अज्ञात वाहनाने जोराची धडक दिल्याने यामध्ये दोघे तरुण गंभीररित्या जखमी होऊन ठार झाल्याची घटना नवगण राजुरी परिसरातील देवराज हॉटेलच्या बाजुला घडली आहे. शुभम महादेव डोके व बालाजी खेलबा चादर (रा. पारगाव ता. वाशी ) या तरुणाच्या मोटारसायकलला रात्री अज्ञात वाहनाने जोराची धडक दिली. या अपघातात दोघेजण गंभीररित्या जखमी होऊन ठार झाले आहेत. या प्रकरणी अज्ञात वाहन धारकाविरोधात बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गरजू रुग्णांना मदत कक्षातून आधार

**बीड । प्रतिनिधी**

फेब्रुवारी महिन्यात ३५ रूग्णांना २३,९५००० लखाची मदत शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व धर्मवीर प्रतिष्ठान कार्यालय बीड मदतीचा आधार.आडल्या नडलेल्या रुग्णांना मदतीला धावून जात शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष उपचारासाठी गरीब रुग्णांना आर्थिक आधार देत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे संकल्पित या वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील गरजू रुग्णांना लाखोंची मदत करण्यात आली. असल्याची माहिती बीड जिल्ह्याचे धर्मवीर प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाजीराव चव्हाण यांनी दिली. पैशाअभावी आजारवरील उपचार थांबावा लागतो. आजारपणात गरीब रुग्ण उपचार घेण्याऐवजी आजारपणाशी संघर्ष करत असतात त्यांना हा संघर्ष करावा लागू नये यासाठी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष प्रभावीपणे कृतिशील व गतिशील केले आहे. याच कक्षाच्या माध्यमातून जिल्ह्यातील गरजू रुग्णांना अर्थसाह्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे संस्थापक मंगेश चिवटे यांच्यावर संबंधित कक्षेच्या जबाबदारी असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील अनेक रुग्णसेवक निस्वार्थपणे कक्षाचे काम करत आहेत.जिल्ह्यातही या कक्षाचे काम वेगाने सुरू असून शिवसेना वैद्यकीय जिल्हा प्रमुख महादेव मतकर हे रुग्णांना उपचार खर्चात सवलत मिळवून देण्याचे कर्तव्य बजावत आहेत. बाजीराव चव्हाण वैद्यकीय सहाय्यक यांच्या सहकार्यातून फेब्रुवारी महिन्यात २३,९५००० एवढी आर्थिक मदत रुग्णांना



मिळवून देण्यात आली आहे.अशी माहिती बाजीराव चव्हाण यांनी दिली. अर्थसाह्यय मिळालेल्या रुग्णांची नावे पुढीलप्रमाणे१ ) शिवदास महादेव आदनक गाव आंबेजोगाई आजार मेंदू रोग रक्कम ५०००० हजार रुपये २) दामिनी ऋषिकेश पाटोळे गाव म्हाळसा जवळा आजार नवजात बालक रक्कम ५०००० हजार रुपये ३) गीता गोपीनाथ सव्वाशे गाव वडवणी आजार नवजात बालक रक्कम ५०००० हजार रुपये ४) उत्तम दादासाहेब उदगे गाव अहमदनगर आजार मेंदू रोग रक्कम ५०००० हजार रुपये ५) अर्पिता विशाल गंनगे गाव नेकनूर आजार नवजात बालक रक्कम ५०००० हजार रुपये ६) सुखदेव मनकाजी गुजर गाव माजलगाव आजारा अपघात रक्कम १००००० लाख रुपये ७) उत्तम आत्माराम घल्लळ गाव कोल्हारवाडी आजार अपघात रक्कम ५०००० हजार रुपये ८) सविता बाळू करचे गाव सोलापूर आजार हिप रिप्लेसमेंट रक्कम ६५००० हजार रुपये ९) अक्षय संजय ढोले गाव जळगाव आजार अपघात रक्कम १००००० लाख रुपये १०) सुवर्णा नाथाभाऊ परजणे गाव खालापूरआजार नावजत बालक रक्कम ५०००० हजार रुपये ११) सदाशिव न्यानोबा शिंगारे गाव अरणवाडी आजार केमोथेरेपी रक्कम ५०००० हजार रुपये १२) मंगल सुभाष चौगुले गाव कोल्हापूर आजार केमथेरेपी रक्कम ५०००० हजार रुपये १३) शेख नुमान हरूण गाव बीड ग्रामीण आजार नऊजात बालक रक्कम ५०००० हजार रुपये १४) अशोक तानाजी अहिरे गाव नाशिक आधार मेंदू रोग रक्कम १००००० लाख रुपये १५ ) वैशाली महेश वरंगुळे बेबी (१) गाव पाटोदा आजार नवजात बालक रक्कम ५०००० हजार रुपये १६)वैशाली महेश वरंगुळे बेबी (२) गाव पाटोदा आजार नवजात बालक रक्कम ५०००० हजार रुपये १७) मुक्ताबाई गंगाराम कारंडे गाव तरटेवाडी आजार कर्करोग रक्कम १००००० लाख रुपये १८) बाबासाहेब भाऊराव जाधव गाव छत्रपती संभाजीनगर आजार कर्करोग रक्कम १००००० लाख रुपये १९) प्रशांत मोहन गावडे गाव सिंधुदुर्ग आजार मेंदू रोग रक्कम ५०००० हजार रुपये २०) शेख शबीर मेहिताब गाव वाशिम आजार हीप रिप्लेसमेंट मदत १००००० लाख रुपये २१) शेख आरिफ शेख गाव परभणी आजार अपघात मदत १००००० लाख रुपये २२) देवदास दिगंबर बहिर गाव आहेर चिंचोली आजार ह्रदयरोग रक्कम १००००० लाख रुपये २३) विमल भास्कर पानसरे गाव खडकी, बीड आजार हीप रिप्लेसमेंट रक्कम १००००० रुपये २४) कृष्णा गोकुळ शिंदे गाव आष्टी बीड आजारा अपघात रक्कम १००००० लाख रुपये २५) वर्षा दीपक घोडके गाव लोणंदगाव आजार नवजात बालक रक्कम ५०००० हजार रुपये २६) प्रसाद सुनील वायदंडे गाव सांगली आजार डायलिसिस रक्कम ५०००० हजार रुपये २७) शालनबाई दगडू गायकवाड गाव नाळवंडी नाका आजार मेंदू रोग रक्कम ३०००० हजार रुपये २८) सीमा सखाराम यमगर गाव तांदळवाडी आजार नऊजात बालक रक्कम ५०००० हजार रुपये २९) यशदीप सुरेश वायभट गाव पिपरणाई आजार नऊजात बालक रक्कम ५०००० हजार रुपये ३०) राजू शांताराम सत्रालकर गाव राजीनगर आजार ह्रदयरोग रक्कम ५०००० हजार रुपये ३१) प्रतीक्षा तुकाराम लाखे गावदेव पिंपरी आजार नवजात बालक रक्कम ५०००० हजार रुपये ३२) विष्णू विनायक कदम गाव माजलगाव आजार ही प्रीप्लेसमेंट रक्कम १००००० लाख रुपये ३३) धनंजय चंद्रसेन देशमुख गाव तुळजापूर आजार ह्रदयरोग रक्कम १००००० लाख रुपये ३४) जगन्नाथ धर्माजी म्हात्रे गाव रायगड आजार मेंदू रोग रक्कम १००००० लाख रुपयेगोरगरीब रूग्णांच्या हक्काचे ठिकाण म्हणजे धर्मवीर प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष- : बाजीराव (दादा) चव्हाण यांनी चालु केलेले शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व धर्मवीर प्रतिष्ठान कार्यालय बीड गरजु रुग्णांनी अवश्य संपर्क साधावा.

# श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांना निरोप

**बीड । प्रतिनिधी**

शालेय जीवनातील शिदोरीवरच दहावी नंतर विदयार्थ्यांना जडणघडणीसाठी, करिअरसाठी हजारो वाटा असून आपल्यातील 'स्व' ची ओळख विद्यार्थ्यांनी करून जिद्द, सातत्य, संयम आणि प्रार्थना यांच्या माध्यमातून जीवनात उज्वल यश संपादन करावे असे सांगत शालेय जीवनातील शिदोरीवरच विद्यार्थ्यांचे आयुष्य घडते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनात शालेय जीवन फार महत्त्वाचे आहे असे मौलिक विचार शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक तथा आदर्श मुख्याध्यापक गणेशराव वाघ यांनी शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या सदिच्छा समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर रोटरी क्लब बीडचे अध्यक्ष तथा आयकॉन करिअर अकॅडमीचे संचालक प्रा.खांडे,



मिथुन जोगदंड, दत्तात्रय चव्हाण सर, आत्माराम वाव्हळ सर, श्रीमती साळुंके, श्रीमती सानप मॅडम, गुजर सर आदी उपस्थित होते. बीड शहरापासून जवळच असलेल्या शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालया मध्ये दिनांक २८ फेब्रुवारी रोजी दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी 'सदिच्छा समारंभ' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर आलेल्या मान्यवरांचा सत्कार स्वागत गीतासह पुष्पगुच्छ शाल आणि श्रीफळ देऊन करण्यात आला. या सत्कार समारंभानंतर इयत्ता आठवी वर्गातील कु. रूपाली थोरात, कु.शेख अलिशा, कु. अमृता पाखरे, नववी वर्गातील कु. यशवंती खराडे यांनी दहावीच्या विद्यार्थ्याबाबत आपले मनोगत व्यक्त केले. तर इयत्ता दहावीच्या वर्गातील कु. आयमन शेख, कु. अंजली सौंदरमल, कु.ऋतुजा तावरे कु.समृद्धी भडगळे, कु.निर्जला जोगदंड, कु.तेजश्री भडगळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच शाळेतील सहशिक्षिका श्रीमती साळुंके मॅडम, श्रीमती सानप मॅडम यांनी आपले विचार व्यक्त केले. त्यानंतर प्रमुख पाहुणे प्रा. कृष्णा खांडे यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना प्रा. कृष्ण खांडे म्हणाले की, शाळेतून दिल्या जाणाऱ्या संस्कारावरच विद्यार्थ्याचे पुढील भविष्य कसे घडवले जाते याचे विविध उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## चेअरमनवर फसवणुक, ॲट्रॉसिटीचा गुन्हा

**केज । प्रतिनिधी**

तांबवा ( ता. केज ) येथील गृहनिर्माण संस्थेच्या चेअरमनने संस्थेच्या नावे असलेल्या एकाच प्लॉटची दोघांना नोटरी करून देत फसवणूक केल्याप्रकरणी चेअरमनविरुद्ध फसवणुकीसह ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकाराने दुय्यम निबंधक कार्यालयामार्फत खरेदी खत न करता वरचेवर जागा व प्लॉटची नोटरी करून देणाऱ्या लोकांमध्ये खळबळ उडाली आहे. केज तालुक्यातील तांबवा येथे श्री भगवान बाबा गृहनिर्माण संस्थेच्या नावाने तांबवा येथे गट नं/सर्व्हे नं १२७ मध्ये १.९२ हे आर जमीन आहे. या गृहनिर्माण संस्थेचे चेअरमन दिलीप हरिभाऊ चाटे यांनी या भूखंडापैकी ३०ह४० फूट आकाराचा प्लॉट हा तांबवा येथील अंध शाहीर विष्णू ओव्हाळ यांचा मुलगा आनंद ओव्हाळ यास ९ डिसेंबर २०२३ रोजी ५० हजार रुपयांमध्ये विक्री केला.

# अधिष्ठाता डॉ.खैरे यांचा सेवापुर्ती समारोह संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

आपल्या ३४ वर्षाच्या प्रदीर्घ शासकीय सेवा काळात अंबाजोगाई शहरातील माणसांनी आणि स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी दिलेले प्रेम विसरणे शक्य नाही असे मत स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. भास्कर खैरे यांनी सेवापुर्ती निमित्ताने आयोजित गौरव सोहळ्यात बोलताना व्यक्त केले. वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिसेविका कार्यालय परिसरातील सभागृहात अधिष्ठाता डॉ. भास्कर खैरे यांच्या सेवापुर्ती निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड येथील पद्मश्री डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख होते. व्यासपीठावर हिंगोली शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. चक्रधर मुगल, डॉ. भास्कर खैरे यांच्या सुविध्द पत्नी तथा औरंगाबाद येथील बालरोग विभाग प्रमुख डॉ. प्रभा खैरे, महाविद्यालयाचे सर्व विभाग प्रमुख व इतर मान्यवर उपस्थित होते. आपल्या विस्तारीत



मनोगतात बोलताना अधिष्ठाता डॉ. भास्कर खैरे पुढे म्हणाले की, माझ्या एकुण ३४ वर्षाच्या शासकीय सेवा काळापैकी जवळपास २० वर्षांचा सेवाकाळ हा अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयात विविध पदांवर काम करतांना गेला आहे. वैद्यकीय पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर १९९३ मध्ये आपण सहयोगी प्राध्यापक म्हणून येथे रुजू झालो आणि विभागप्रमुख व अधिष्ठाता पदापर्यंत काम करण्याची संधी मिळाली. शासकीय सेवेत काम करतांना अंबाजोगाई शहरातील माणसांनी आणि स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांनी मला जे प्रेम दिले, माझ्यावर जो विश्वास दर्शवला तो विसरणे अशक्य असल्याचे त्यांनी सांगितले. प्रारंभी डॉ. भास्कर खैरे यांचा विस्तृत असा परिचय नेत्र विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. एकनाथ शेळके यांनी करुन दिला. आपल्या परिचयात डॉ. शेळके यांनी डॉ. भास्कर खैरे यांच्या अनेक बाबींना स्पर्श करीत त्यांच्या वेगवेगळ्या पैलुंची माहिती दिली. यावेळी कर्मचारी संघटनेचे प्रतिनिधी, कास्ट्राइब कर्मचारी प्रतिनिधी, के. डॉ. बावळे, सहकारी पतसंस्था, परिचारिका फेडरेशन, परिचारिका प्रशिक्षण महाविद्यालय, महाविद्यालयाच्या विविध विभागांच्या वतीने शाल, सन्मान पत्र, स्मृतीचिन्ह भेटवस्तू, बुके, हार देवून सत्कार करण्यात आला. तर डॉ. सिध्देश्वर बिराजदार, डॉ. राकेश जाधव, डॉ. विश्वजित पवार, डॉ. शंकर धपाटे, डॉ. मुकुंद मोगरीकर, अधिसेविका कुरतडकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना अधिष्ठाता डॉ. भास्कर खैरे यांच्या कार्याचा गौरव करुन त्यांना सेवापुर्तीच्या व भावी उज्वल आरोग्य, आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. आपल्या अध्यक्षीय समारोप पद्मश्री डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांनी अधिष्ठाता डॉ. भास्कर खैरे यांनी केलेल्या कामाची प्रशंसा करीत एकाच कॅम्प मध्ये ३,३०० नेत्र शस्त्रक्रिया करण्याचा विक्रम डॉ. भास्कर खैरे यांनी अंबाजोगाई येथील कै. डॉ. विमलताई मुंदडा यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित नेत्र शस्त्रक्रिया शिबिरात केला असल्याची आठवण करून देवून प्रशासकीय कामकाज करण्याच्या त्यांच्या विशिष्ट कार्यपद्धतीची प्रशंसा केली. या कार्यक्रमास औरंगाबाद, लातुर, नांदेड, हिंगोली, धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत असलेले विविध विभागप्रमुख, स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या सर्व विभागांचे प्रमुख, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, परिचारिका, विद्यार्थी, सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विनोद वेदपाठक यांनी केले तर आभार रुग्णालय विभागाचे अधिक्षक डॉ. राकेश जाधव यांनी मानले.




# आष्टी तालुक्यात कार्यकर्ता मेळावा संपन्न

**आष्टी । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीतर्फे संपूर्ण देशभरात शेवटच्या घटकापर्यंत विकासाची गंगा पोहोचवण्यासाठी व्यापक जनसंपर्कासाठी ''गाव चलो अभियान'' सुरू आहे.त्या अनुषंगाने आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे मा.आ.भीमराव धोंडेयांनी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, भाजपा राष्ट्रीय सचिव लोकनेत्या पंकजाताई मुंडे, खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या



मार्गदर्शनाखाली आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यात गाव चलो अभियान हाती घेतले असून ठिकठिकाणी कार्यकर्ते मेळाव्याचे आयोजन आष्टी तालुक्यातील दादेगाव येथे करण्यात आले होते. मोदी सरकारचे प्रभावी कामे घराघरात पोहोचवत आहेत. भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र भाई मोदी जगभरात प्रसिद्ध असून पुन्हा प्रधानमंत्री करण्यासाठी बीड जिल्ह्याच्या दबंग खासदार प्रितमताईंना पुन्हा एकदा खासदार करण्यासाठी मोदी सरकारने केलेली कामे पोहचवणे गरजेचे आहे.भारत देश मोदींच्या नेतृत्वाखालील प्रगतशील देश म्हणून १२ व्या क्रमांकावरून आज ५ क्रमांकावर आला आहे. आता लवकरच ३ क्रमांकावर आणण्यासाठी मोदींचा माणस असून लोकसभेला प्रितम ताईंना साथ द्यावी खा.प्रितमताईंच्या नेतृत्वाखाली मतदारसंघात मोठ्या प्रमाणात विकास कामे झाले आहेत.असे प्रतिपादन मा.आ.भीमराव धोंडे यांनी केले ते दि.०१ मार्च रोजी दुपारी आष्टी तालुक्यातील दादेगाव येथे गाव चलो अभियानात कार्यकर्ता बैठक प्रसंगी बोलत होते.त्यांनी या गटातील विविध घटकांशी व कार्यकर्त्यांशी संवाद साधला विचारांची देवाणघेवाण होत आहे.

## बेघरांच्या हक्कासाठी आमचा लढा

**बीड । प्रतिनिधी**

सर्व बेघरांना कायमचा निवारा मिळावा यासाठी आमचा लढा सुरू आहे. त्यामुळे सर्वप्रथम भोगवटाधारकांची नांवे मालकी हक्कात घेवून शहरातील सर्व झोपडपट्टीवासीयांसाठी घरकुल योजना प्रभावीपणे राबविण्यात यावी, यासाठी दारिद्र्यरेषेची जाचक अट रद्द करा. आदी प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी जनतेच्या समस्या घेऊन मागील ८ ते ९ वर्षांपासून आम्ही प्रयत्न करीत आहोत. लढ्याला आता यश मिळत आहे. पहिल्या टप्प्यात अंबाजोगाई शहरातील तब्बल ५४ घरकुलांना मंजुरी मिळाली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com